एएफए: एए1/10593/02/300627/109089; दि. 30.06.2027 वैधपर्यंत वैध
पत्ता: 205वी, आर्केडिया बिल्डिंग, एनसीपीए मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-400021
ईमेल आयडी : Vijayplulla@rediffmail.com **संपर्क क्र.:** 022 20821220

पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रकिया कक्ष

निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक: ०३-११-२०२६ ते ११-११-२०२६ दुपारी १२:०० पर्यंत

स्वीकृती दिनांक : ०३-११-२०२६ ते ११-११-२०२६ दुपारी १२:०० पर्यंत **तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :** १२/११/२०२६ दु. १२:३०

अ. क्र.	निविदा क्र.	खात्याचे नाव	कामाचे नाव	निविदा संच किंमत रू.	अंदजित पुर्वगणित रक्कम रुपये	बयाणा रक्कम रु.	कामाची मुदत	निविदा विषयक जबाबदार व्यक्तिचे नाव व दुरध्वनी क्रमांक
१	PMC/GARDEN/ 2026/244	उद्यान विभाग	प्र.क्र.३५ अ मधील तुकाईमाता गार्डन येथे स्थापत्य विषयक कामे व देखभाल दुरुस्तीची कामे करणे	१३५९.००	२५३५५५६.००	२५३५६.००	४ महिने	श्रीमती. घोलप ९६८९९३४३५०
२	PMC/GARDEN/ 2026/245	उद्यान विभाग	महात्मा गांधी उद्यान (बंडगार्डन) येथे नुतनीकरणाची उर्वरित कामे करणे.	१३५९.००	२५२४९१८.००	२५२४९.००	४ महिने	श्रीम. आढाव ९६८९९९०१०७
३	PMC/GARDEN/ 2026/248	उद्यान विभाग	उपआयुक्त क्र ३ अंतर्गत वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयामधील विविध उद्यानात स्थापत्य विषयक सुधारणा कामे करणे	१३५९.००	४०५१६९०.००	४०५१७.००	११ महिने	श्रीमती. घोलप ९६८९९३४३५०
४	PMC/GARDEN/ 2026/249	उद्यान विभाग	प्र.क्र.४ क, खराडी सर्वे नं. १८, १९ येथे गार्डन करणे.	६०७९.००	८३९९१४०.००	८३९९१.००	४ महिने	श्री. पांडुळे ८९७५२५८१८१
५	PMC/GARDEN/ 2026/251	उद्यान विभाग	उपआयुक्त क्र. २ अंतर्गत कोथरुड बावधन क्षेत्रिय कार्यालयामधील विविध उद्यानात स्थापत्य विषयक सुधारणा कामे करणे.	१३५९.००	३४३६११४.००	३४३६१.००	११ महिने	श्री. राऊत ९८२२०६६४६४
६	PMC/GARDEN/ 2026/253	उद्यान विभाग	उपायुक्त क्र.२ अंतर्गत औंध क्षेत्रिय कार्यालयामधील विविध उद्यानात स्थापत्य विषयक सुधारणा कामे करणे.	१३५९.००	३५२५५७२.००	३५२५६.००	११ महिने	श्री. राऊत ९८२२०६६४६४
७	PMC/GARDEN/ 2026/254	उद्यान विभाग	प्रभाग क्र. ८ ड मध्ये मारुतराव गायकवाड, रामलक्ष्मण उद्यान छत्रपती शिवाजी उद्यान, छत्रपती शाहू महाराज पक्षिविहार येथील विविध विकास कामे व सुशोभिकरण करणे	६०७९.००	५००५५०७.००	५००५५.००	४ महिने	श्री. राऊत ९८२२०६६४६४

अ) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी / म.न.पा. मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत

ब) सदर कामांबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृत सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

क) कार्यालयीन आदेश क्र अतिमआ (वि.) / ३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ऑनलाईन सुविधेमार्फतच स्विकारणेत येणार आहे

सही/- डॉ.अशोक घोरपडे
सह. महापालिका आयुक्त (उद्यान)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/९८४
दि. ०२/११/२०२६

धर्मवीर संभाजी अर्बन को - ऑप बॅक लि.

मुख्य कार्यालय : ३९१, दि मेलांगे, मुंबई - पुणे रस्ता, फुगेवाडी, पुणे - ४११०१२.
फोन नं. ७०५७२३५३३६ , ७८८७८८२८८२
Email : sambhajibank@hotmail.com, Website : www.sambhajibank.com

ताबा नोटीस नियम ८(१)

ज्या अर्थी,

१. खालील सही करणार धर्मवीर संभाजी अर्बन को- ऑप बँक लि. पिंपरी चिंचवड चे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ नुसार प्राप्त झालेल्या कलम क्र. १३ (२) अन्वये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ व नियम ३ नुसार कर्जदार अलका ज्ञानेश्वर शितोळे (कर्जदार/गहाणदार) २. ज्ञानेश्वर तुकाराम शितोळे (कर्जदार/गहाणदार) ३. स्वप्निल ज्ञानेश्वर शितोळे (जामीनदार) ४. बाळासाहेब लक्ष्मण जगताप (जामीनदार) ५. नितीन दगडू शिंदे (जामीनदार) यांना दि. ३१.१२.२०२५ अखेरची येणेबाकी अ) कर्जखाते क्र. ३/१७३/३०७७६ रक्कम रु. १४,२३,०९१/- (अक्षरी रुपये चौदा लाख तेवीस हजार अकरा फक्त) ब) कर्जखाते क्र.३/१७३/३०७७८ रक्कम रू. ६,९३,२१९/- (अक्षरी रूपये सहा लाख त्र्याण्णव हजार दोनशे एकोणीस फक्त) असे एकुण अ + ब रक्कम रु. २१,१६,२३०/- (अक्षरी रूपये एकवीस लाख सोळा हजार दोनशे तीस फक्त) + दि. ०१.०१.२०२६ पासूनचे व्याज + इतर खर्च ६० दिवसांचे आत भरण्याची मागणी नोटीस दि. १३.०१.२०२६ ने दिलेली आहे. परंतू कर्जदार / गहाणदार / जामीनदार यांनी आज अखेर नोटीशीमध्ये उल्लेख केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार / गहाणदार / जामीनदार व इत्तर तमाम लोकांस कळिवण्यात येते की, सिक्युरिटायझेशन कायदा कलम १३ (४) व नियम ८ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील सही करणा-या प्राधिकृत अधिका-याने खाली उल्लेखिलेल्या मिळकतीचा ताबा दि. २७.१०.२०२६ रोजी घेतलेला आहे. उपरोक्त कर्जदार / गहाणदार / जामीनदार व तमाम लोकांस कळिवण्यात येते की, सदर मिळकती विषयी कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार बँकेच्या लेखी संमतीशिवाय करू नये. जर कोणी असा व्यवहार केल्यास तो बँकेवर बंधनकारक राहणार नाही व सदर मिळकतीवरील धर्मवीर संभाजी अर्बन को- ऑप बँक लि. पिंपरी चिंचवड शाखा सांगवी यांची दि. ३१.१२.२०२५ अखेरील येणेबाकी अ) कर्जखाते क्र.३/१७३/३०७७६ रक्कम रू. १४,२३,०९१ /- (अक्षरी रूपये चौदा लाख तेवीस हजार अकरा फक्त) ब) कर्जखाते क्र. २/१७३/३०७७८ रक्कम रू. ६,९३, २१९ /- (अक्षरी रूपये सहा लाख त्र्याण्णव हजार दोनशे एकोणीस फक्त) असे एकुण अ + ब रक्कम रू. २१,१६,२३० /- (अक्षरी रूपये एकवीस लाख सोळा हजार दोनशे तीस फक्त) + दि. ०१.०१.२०२६ पासूनचे व्याज + इतर खर्च तसेच संपूर्ण कर्ज फिटेपर्यंतच्या व्याजाचा बोजा अबाधित राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

तुकडी पुणे, पोट तुकडी व ता. हवेली, जि. पुणे मे दुय्यम निबंधक हवेली यांच्या हद्दीतील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालीका पुणे यांच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे सांगवी येथील स.नं. ७८ / १ यांनी एकुण क्षेत्र ०० हेक्टर. १४.७५ आर यांसी आकार रूपये १-०५ पैसे पैकी क्षेत्र ७५० चौरस फुट हि जमीन मिळकत व तसेच या जमीन मिळकतीवर बांधण्यात आलेल्या संपुर्ण आर. सी. सी व इतर बांधकाम हि मिळकत यांसी तळ मजल्यावरील क्षेत्र ३८६.२२ चौरस फुट व बिगर निवासी एक दुकान यांसी क्षेत्र १०८ चौरस फुट व तसेच पहिला मजला वाढीव बांधकाम क्षेत्र ६७२ चौरस फुट व त्याचप्रमाणे दुसऱ्या मजल्यावरील वाढीव साधे बांधकाम क्षेत्र २२५ चौरस फुट हि मिळकत यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत क्र. ०५/०४/०४२४१ व त्याचप्रमाणे त्यावर होणा-या भविष्यातील वाढीव बांधकामासह यांसी चतु:सीमा -

पूर्व :- श्री. जगताप यांची मिळकत
दक्षिणेस - रस्ता
पश्चिमेस - लुईस यांची मालमत्ता
उत्तेरस :- साबेरा कॉम्पलेक्स हि इमारत

दिनांक: २७/१०/२०२६ शिक्का **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : पुणे. **श्री. युवराज सोपान जागडे**
धमवीर संभाजी अर्बन को-ऑप बँक लि.

TJSB SAHAKARI BANK LTD. MULTI STATE SCHEDULED BANK

नोंदणीकृत कार्यालय : टीजेएसबी हाऊस, प्लॉट नं. बी-५, रोड नं. २, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४. **फोन :** ०२२-६९९७ ८७३१
प्रादेशिक वसुली कार्यालय : १ ला मजला, ६९२/६९३, चाफळकर सेंटर, चाफळकर कॉलनी, मार्केटयार्ड रोड, पुणे-४११०३७. **फोन :** ०२०-२४२२३५३१/३२, ७२०८९३२०३४, ७२०८९३१३३२

विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट)रूल्स २००२ मधील रुल ८(६) आणि रुल ९ च्या अटींनुसार स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता लिलाव विक्री सूचना.

या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि विशेषकरुन कर्जदार/गहाणखतदार आणि/किंवा जामीनदार यांना सूचना देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत आहेत आणि टीजेएसबी सहकारी बँक लि. यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी सदर मालमत्तांचा सरफेसी ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(४) आणि सेक्शन (१४) अंतर्गत आदेशाची अंमलबजावणी करुन **ताबा** घेतला असून, सदर मालमत्तांची **''जसे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'', ''तेथे जे आहे''** आणि **''कोणत्याही फेरविचाराशिवाय'' आणि जंगम मालमत्तेशिवाय** या तत्त्वावर खाली नमूद केलेले कर्जदार/गहाणखतदार/जामीनदार यांच्याकडून खाली नमूद परीशिष्टामधील येणे असलेली थकित रक्कम वसूल करण्यासाठी विक्री करण्यात येणार आहे.

कर्जदाराचे / जामीनदार/गहाणखतदाराचे नाव	स्थावर मालमत्तेचे/मालमत्तांचे वर्णन
१) मे. रोहन कोरूपॅक प्रा.लि. .... कर्जदार/ गहाणखतदार २) श्री. सुयश सुभाष गांधी ...संचालक/गहाणखतदार/जामीनदार ३) सौ. रचना सुयश गांधी ...संचालक/जामीनदार पीआरओ वसुली, पुणे कर्ज खाते क्रमांक - 027/CCR/017130100000145 027/CCR/BDR/ 017130100000146 027/PRLNR/017302900000111 027/PRLNR/017302900000125 027/ADVHYPR/017300700000113 027/ADVHYPR/017300700000119 027/ECLGSTL1R/ 017307800000006	प्लॉट नं. पीएपी-७३ या जमिनीचा सर्वसामाईक भाग, खंडाळा फेज-I, इंडस्ट्रीयल एरीया, गांव/शहर केसुर्डी, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा यांच्या हद्दीत, क्षेत्रफळ ६२७० चौ.मी., तसेच त्यावरील बांधकामासहीत आणि सदर प्लॉटच्या **चतु:सीमा : पूर्वेस** : ६, प्लॉट नं. पीएपी ७२/२, **दक्षिणेस** : एमआयडीसी मोकळी जागा नं. ५, **पश्चिमेस** : पीएपी प्लॉटस्, **उत्तरेस** : एमआयडीसी ३०.०० मीटर रूंद रस्ता. **(मे. रोहन कोरूपॅक प्रा.लि. यांच्या मालकीची मालमत्ता.)** **बोजा (जर काही असेल तर) :** सुरक्षित धनको यांना माहित नाही **थकीत देणी :** एमएसईडीसीएल (लाईट बिल) : रु. २,४२,८००.०० (दि. ३१.१२.२०२५ रोजी) एमआयडीसी (वॉटर बिल) : रु. १,०९,३६८.०० (दि. ३१.०७.२०२६ रोजी) ग्रामपंचायत आकार : रु. ९,९६,९९०.०० (दि. २२.०६.२०२६ रोजी)
मालमत्ता पाहणी दिनांक व वेळ : दि. १२/११/२०२६ स. ११.०० ते दु. २.००	मालमत्तेच्या लिलावाचा दिनांक आणि वेळ : दि. २१/११/२०२६ स. १०.३० वाजता
ताबा घेतल्याची तारीख आणि ताब्याचा प्रकार : दि. २०/१२/२०२५, प्रत्यक्ष ताबा	एकूण येणे : दि. ०९/०४/२०२५ रोजीच्या मागणी नोटीसीनुसार रु. ८,३८,७१,७७२.५८ आणि दि. ३१/१०/२०२६ रोजी येणे रक्कम रु. ८,७३,६६,६२९.५८
राखीव किंमत : रू. ८,३५,००,०००/- अनामत रक्कम : रू. ८३,५०,०००/-	लिलावाचे ठिकाण : टीजेएसबी सहकारी बँक लि., १ ला मजला, ६९२/६९३, चाफळकर सेंटर, चाफळकर कॉलनी, मार्केटयार्ड रोड, पुणे-४११०३७.

अटी व शर्ती :

१) ठळकपणे **"मे. रोहन कोरूपॅक प्रा. लि. यांच्या खंडाळा फेज-I, केसुर्डी, जिल्हा सातारा येथील प्लॉट नं. पीएपी-७३, या स्थावर मालमत्तेच्या खरेदीसाठी"** एका मोहोरबंद पाकिटातून प्रस्तावांना ठेवून सदर प्रस्तावाचे मोहरबंद पाकिट वर नमूद लिलावाच्या ठिकाणी **दि. २०/११/२०२६ रोजी सायं. ५.०० पूर्वी आणावेत आणि दि. २०/११/२०२६ रोजी सायं. ५.०० पूर्वी** ईएमडी रक्कम **डीडी / पेऑर्डर / आरटीजीएस द्वारे, खाते क्र. ००१९९५२०००००००२, आयएफएससी कोड TJSB0000001** मध्ये हस्तांतरित करावी.

२) निम्नस्वाक्षरीकारांकडून अशा तऱ्हेने प्राप्त झालेले प्रस्ताव उपरोक्त **लिलावाच्या ठिकाणी दि. २१/११/२०२६ रोजी स. १०.३०** वाजता उघडून विचारात घेतले जातील.

३) कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि / किंवा लिलाव रद्द करण्याचे आणि / किंवा सुधारण्याचे आणि / किंवा पुढे ढकलण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवले आहेत.

४) सर्व किंवा अशा कोणत्याही व्यक्ती (व्यक्तींना) या मालमत्तेबाबत वाटा, हक्क, शीर्षक, लाभ, व्याज, दावा किंवा मागणी यांच्या उक्त मालमत्तांच्या किंवा त्यांच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, वाटप, देवाणघेवाण, गहाण, भाडे, पोट-भाडे, भाडेपट्टी, धारणाधिकार, शुल्क, देखभाल, परवाना, भेटवस्तू, वारसा, वाटा, ताबा, सहजता, विश्वस्त, वसीयत ताबा, असाईनमेंट किंवा कोणत्याही स्वरूपाचा भार किंवा अन्यथा खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोस्वाक्षरीत लेखी कळवावे अशी विनंती केली जात आहे. जाहिरात प्रकाशित झाल्यापासून **७ दिवसांच्या आत** सर्व आवश्यक आणि सहाय्यक दस्तऐवजांसह, अशा दाव्याचा संदर्भ न देता कोणता व्यवहार पूर्ण केला गेला नाही तर अशा कोणत्याही व्यक्तीने त्याचे अधिकार माफ केले आहेत असे मानले जाईल आणि **टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड** वर बंधनकारक राहणार नाही.

५) अटी आणि शर्तीं

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

संपादकीय

दिवाळीपूर्वीची दिवाळखोरी


नेमक्या दिवाळीच्या काळातच प्रदूषणाचा विषय हा ऐरणीवर येत असतो. या काळात फटाके, रोषणाई, याचे प्रमाण जास्त असते. म्हणून याच काळामध्ये ध्वनी आणि वायूप्रदूषण कमीत कमी व्हावे अशा पद्धतीने जनजागृती केली जाते. अलिकडेच मुंबई महापालिकेने मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दिवाळीच्या काळात प्रदूषण टाळण्याच्या उद्देशाने एक प्रचार मोहीम सुरू केली आहे. ज्यामध्ये सेलिब्रेटी म्हणजेच नटनट्या किंवा कलाकारांच्या मदतीने दिवाळीच्या काळात काय गोष्टी कराव्यात आणि करू नयेत याबाबतचा संदेश देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. मुंबई महापालिकेने तयार केलेल्या या सेलिब्रेटींच्या चित्रफितींमध्ये माधुरी दीक्षित, क्रिकेटपटू अजिंक्य राहाणे, दिया मिर्झा यांचे व्हिडिओ महापालिकेने तयार करून आपल्या वेबसाईटवरही अपलोड केले. यातल्या दिया मिर्झाच्या व्हिडिओत तिने दिवाळीत फटाकेच फोडू नका अशा प्रकारचे आवाहन केले. फटाक्यांशिवाय दिवाळी ही कल्पनाच होऊ शकत नाही. परंतु फटाके फोडताना प्रदूषणविरहित फटाके किंवा अलिकडे हरित फटाकेही बाजारात येत असतात. थोडक्यात ज्यातून प्रदूषण होणार नाही अशाच फटाक्यांचा वापर करण्याचे आवाहन करता येऊ शकते. परंतु दिया मिर्झाने फटाके फोडूच नका, असे म्हटल्यानंतर राजकीय फटाके फोडायलाही सुरुवात झाली. भारतीय जनता पार्टीचे मुंबईचे अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी दिया मिर्झाच्या या व्हिडिओला आक्षेप घेतला आणि दिवाळी कशी साजरी करायची. हे दिया मिर्झाने सांगण्याची गरज नाही, असे म्हणत टीका केली. त्यांच्या या टीकेनंतर महापालिकेने तो व्हिडिओ काढून टाकला. या प्रचारासाठी दिया मिर्झाने सामाजिक हेतू म्हणून महापालिकेकडून कोणतेही मानधन घेतले नाही. परंतु अमित साटमांना या अभिनेत्रीच्या फटाकेच न फोडण्याच्या आवाहनाचा बराच राग आलेला दिसतो. आता या प्रकारावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झालेले आहेत. एकूणच महापालिकेची ही तथाकथित प्रदूषण विरोधातली मोहीम, त्यात सेलिब्रेटींना समाविष्ट करून घेण्याची कल्पना, त्याला झालेला अमित साटमांचा विरोध, तो व्हिडिओ डिलीट करण्यावरून निर्माण झालेले राजकारण हा सगळा प्रकार दिवाळीपूर्वीची दिवाळखोरीच म्हणावी लागते.

प्रदूषण ही कायमची समस्या

वास्तविक पाहता प्रदूषण ही कायमची समस्या झालेली आहे. आणि त्याविरोधात वर्षभर वेगवेगळ्या पद्धतीने उपाययोजना राबवण्याची वेळ आलेली आहे. गेल्या काही वर्षात मुंबई महानगराचं हवामान इतक्या वेगाने पसरते आहे की, जगातले तिसऱ्या चौथ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर म्हणून त्याची गणना होऊ लागलेली आहे. दिवाळी नसताना प्रदूषणाची पातळी वाढलेली असते. हवेची गुणवत्ता खालावलेली असते. त्या काळात हे प्रदूषण रोखण्याबाबत राज्य सरकार असेल, महापालिका असेल. प्रदूषण नियंत्रण मंडळ असेल. त्यांच्याकडून नेमकी काय उपाययोजना होते. खरे तर प्रदूषणावर नियंत्रण आणणारे प्रभावी उपाय योजले जात नाहीत. म्हणूनच हवेची गुणवत्ता सातत्याने खालावत असते. गेल्याच आठवड्यात मुंबईतल्या या प्रदूषणाची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन मुंबई भाजपाचेच माजी अध्यक्ष आणि सध्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी आठवड्यातून एकदा मुंबईतली बांधकामं बंद ठेवण्याचे आवाहन केलं. आणि तशा आशयाचं पत्र मुंबई महापालिकेलाही पाठवलं होतं. याचा अर्थ मुंबईत हवेचं प्रदूषण वाढलं असल्याची कबुली भाजपाच्याच एका नेत्याकडून दिली जाते. तर दुसरीकडे याच प्रदूषणाच्या पालिकेच्या मोहिमेवर भाजपाचा दुसराच नेता प्रश्नचिन्ह उपस्थित करतो आहे. याचा अर्थ समन्वयाचा अभाव आणि एकाच समस्येकडे पाहण्याची वेगवेगळी दृष्टी हेच त्यातून स्पष्ट होते. महापालिकेलासुद्धा मुंबई न्यायालयाच्या निर्देशांची दिवाळीच्याच मुहूर्तावर आठवण झाली. आणि दिवाळीच्या काळात प्रदूषण वाढू नये. म्हणून सेलिब्रेटींचे हे झगमगाटी व्हिडिओ तयार करण्याची बुद्धी झाली. इतर अभिनेत्रींनी किंवा सेलिब्रेटींच्या व्हिडिओला आक्षेप घेतलेले नाहीत. फक्त दिया मिर्झाचाच व्हिडिओ साटमांना जास्त खटकण्याचे कारण काय. मिर्झा यांचा धर्म हेच त्याचे कारण असू शकते. खरे तर प्रचारकी थाटातल्या या व्हिडिओवरून एवढा आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही. प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने दिवाळी साजरी करत असतो.

वर्षभर जनजागृतीची गरज

सेलिब्रेटींच्या अशा आवाहनामुळे लोकांच्या दिवाळी साजरी करण्यावर फारसा परिणाम होत नाही. प्रामुख्याने सणवारांबाबत यात्रा उत्सवांबाबत लोक फक्त साधुसंत, महात्मे किंवा आध्यात्मिक क्षेत्रातल्या लोकांचे उपदेशच विचारात घेत असतात. यातल्या अनेक सेलिब्रेटीजना हे सण, उत्सव किंवा परंपरांचा इतिहासही माहीत नसतो. केवळ मनोरंजनाच्या दुनियेत किंवा खेळाच्या जगतामध्ये त्यांनी लोकप्रियता मिळवली या एका कारणावरून त्यांनी व्यक्त केलेले विचार लोकमनावर बिंबवले जाऊ शकत नाहीत. महापालिकेने केवळ दिवाळीचा सण लक्षात घेऊन या सेलिब्रेटींचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला. खरे तर महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी संयुक्तपणे केवळ दिवाळीच नव्हे तर वर्षभर या प्रदूषण समस्येविषयी उपाययोजना आणि जनजागृती केली पाहिजे. आताचा एआय तंत्रज्ञानाचा जमाना आहे. त्याचा उपयोग करून अधिक प्रभावशाली उपाययोजना करता येऊ शकते. प्रत्यक्षात प्रदूषण रोखण्यासाठी जे जे उपाय आवश्यक आहेत तेच केले जात नाहीत. आणि अशा तात्पुरत्या प्रचारांवर भर दिला जातो. ज्या कारणांमुळे प्रदूषण होते. मग अगदी वाहनांची भरमसाठ संख्या आणि अनेक उद्योगांमधून होणारे वायूप्रदूषण, जलप्रदूषण रोखण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. आज सार्वजनिक परिवहन सेवा तितकीशी प्रभावी नसल्याने लोकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. आणि त्यातून वायूप्रदूषणाला निमंत्रण मिळते. महापालिकेने असे प्रदूषण निर्माण करणाऱ्या गोष्टींची सविस्तर माहिती लोकांपर्यंत पोहचवण्याची गरज आहे. त्याची सुरुवात प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयाच्या परिसरातील प्रदूषण रोखण्यापासून करावी. हे उपाय केले जात नाहीत आणि हीच ती बौद्धिक दिवाळखोरी ठरते.



भारताचा सलग पाचवा विजय

दक्षिण कोरियाचा ८-० ने धुव्वा उडवला

■ ऑकलंड



आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारतीय संघाची अपराजित कामगिरी सुरूच आहे. जालंधरमध्ये आज झालेल्या अंतिम साखळी सामन्यात पाच वेळच्या विजेत्या भारताने दक्षिण कोरियाला ८-० ने पराभूत केले. या विजयासह भारतीय संघाने स्पर्धेतील आपली अपराजित मालिका कायम ठेवत सलग पाचवा विजय नोंदवला. त्यामुळे भारत सर्वाधिक १५ गुणांसह गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आहेत. जपान दुसऱ्या, मलेशिया तिसऱ्या आणि दक्षिण कोरिया चौथ्या स्थानावर आहे. आता बुधवारी उपांत्य फेरीत भारताचा सामना पुन्हा दक्षिण कोरियाशी होईल.

भारतीय खेळाडू सुरुवातीपासूनच दक्षिण कोरियाविरुद्ध आक्रमकपणे खेळले. भारताच्या दिलप्रीत सिंगने ८व्या आणि ४०व्या मिनिटाला गोल करून दुहेरी यश मिळवले. त्याच्या व्यतिरिक्त, जुगराज सिंग (११व्या मिनिटाला), कर्णधार हरमनप्रीत सिंग (१५व्या मिनिटाला), शिलानंद लाक्रा (३३व्या मिनिटाला), सुखजीत सिंग (३४व्या मिनिटाला), संजय (३६व्या मिनिटाला) आणि अंगद बीर सिंग (६०व्या मिनिटाला) यांनी प्रत्येकी एक गोल केला.

दहिसरमध्ये बुधवारपासून शालेय बुद्धिबळ स्पर्धा

■ मुंबई

बुद्धिबळाच्या पटावर डावपेचांची लढाई रंगविण्यासाठी महाराष्ट्रातील ८०० हून अधिक युवा बुद्धिबळपटू सज्ज झाले. इंडियन चेस स्कूलतर्फे आणि रुस्तमजी केंब्रिज इंटरनॅशनल स्कूल (दहिसर) यांच्या यजमानपदाखाली आयोजित एसबीआय लाईफ महाराष्ट्र राज्य शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेला यंदा विक्रमी प्रतिसाद लाभला. राज्यातील ५०० हून अधिक शाळांमधील खेळाडूंचा सहभाग असलेली ही स्पर्धा ४ ते ६ आणि १३ ते १५ नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांत रंगणार आहे. ७, ९, ११, १३, १५ आणि १७ वर्षांखालील वयोगटांत मुलांचे आणि मुलींचे स्वतंत्र असे एकूण १२ गट असतील. ४०० हून अधिक फिडे मानांकित खेळाडू या बुद्धिबळाच्या रणांगणात उतरतील. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके जिंकलेल्या खेळाडूंचाही समावेश असल्याने प्रत्येक डावात चुरस आणि डावपेचांची कसोटी पाहायला मिळणार आहे. स्विस लीग पद्धतीने ७ फेऱ्यांत होणाऱ्या स्पर्धेत प्रत्येक खेळाडूला ६० मिनिटे आणि प्रत्येक चालीसाठी ३० सेकंदांची वाढ मिळेल.

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई-निविदा सूचना

महावितरणकडून 'महावितरण (MSEDCL) अंतर्गत शहरी विभागांपर्यंतच्या सर्व कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती नोंदणी यंत्रणा स्थापित करणे तसेच सर्व ग्रामीण विभागांतील कार्यालये व उपकेंद्रांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी जिओ-फेन्सिंग (Geo-fencing) सुविधायुक्त मोबाईल ॲपची अंमलबजावणी' करण्याकरिता पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदाचा संक्षिप्त स्कोप आणि पूर्व-पात्रता निकष **www.mahadiscom.in** या संकेतस्थळावरील निविदा सूचनेत उपलब्ध आहेत. निविदापूर्व बैठक दिनांक **१३.११.२०२६** दुपारी ३:०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित करण्यात आली आहे. (**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग लिंक:** https://meet.google.com/sjk-fcux-vkr). निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक **२३.११.२०२६** सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत आहे. संपूर्ण निविदा कागदपत्रे महावितरणच्या ई-निविदा संकेतस्थळ **https://etender.mahadiscom.in** वर उपलब्ध आहे.

निविदा क्र. **CGM/IT/SAP/26-27/006**
निविदा शुल्क : ₹ ११,८००/-
इसारा रक्कम : ₹ ९,६२,३६१/-
HOPR: 268/26 dtd. 02.11.2026

मुख्य महाव्यवस्थापक (मा. तं.),
महावितरण, प्रकाशगड , ४था माळा,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे पूर्व मुंबई - ५१
ई-मेल:
biometrictender@mahadiscom.in

जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येत आहे की, माझे अशिल अश्विनी गणेश विधाते, राहणार – कोपरखैराणे यांनी श्री. शंकर गणपत विधाते आणि अश्विनी गणेश विधाते यांच्या नांवे असलेला फ्लॅट नं. १०, देवी सि.एच.एस.लि., प्लॉट नं. १४, सेक्टर ३, कोपरखैराणे, नवी मुंबई या फ्लॅटचे

१. मेसर्स श्री साई डेव्हलपर्स यांच्या भागीदार श्री. सुनील विजन, श्री. नंदकुमार द्विवेदी आणि श्री. श्रीकांत बडगे यांनी श्री. सुरजन सिंग जोसन यांच्या नावे दिनांक २८/०६/१९९४ रोजी निष्पादित केलेला मूळ विनानोंदणीकृत हक्क हस्तांतरण करार
२. श्री. सुरजन सिंग जोसन यांनी श्री. शंकर गणपत विधाते आणि सौ. अश्विनी गणेश विधाते यांच्या नावे दिनांक ०९/१०/२००९ रोजी निष्पादित केलेला मूळ नोंदणीकृत हक्क हस्तांतरण करार, नोंदणी क्रमांक TNN8/6449/2009, तसेच नोंदणी पावती, मुद्रांक शुल्क भरल्याची पावती आणि इंडेक्स-II.
३. सदर मिळकतीसंदर्भात सिडको यांनी देवी सी.एच.एस.लि. यांच्या नावे दिनांक १६/०७/२०१२ रोजी जारी केलेला मूळ अंतिम आदेश
४. सिडको यांनी श्री. शंकर गणपत विधाते आणि सौ. अश्विनी गणेश विधाते यांच्या नावे जारी केलेला मूळ हस्तांतरण आदेश.
५. सध्याच्या मालकांच्या नावे सोसायटीने जारी केलेले मूळ भाग प्रमाणपत्र.

सर्व कागदपत्र हरवलेले आहे. याबाबतची पोलीस तक्रार कोपर खैरणे पोलीस स्टेशन, येथे ३१/१०/२०२६ रोजी दाखल करण्यात आली आहे. तक्रार अनुक्रमांक २१००/२०२६ मधील मालमत्ता गहाळ रजिस्टरमध्ये ही नोंद आहे.

सर्व व्यक्ती/व्यक्तींना याद्वारे सूचित केले जाते की वरील मालमत्तेबद्दल दावे किंवा हरकत असल्यास ०७ दिवसाचे आत खालील पत्यावर हरकत घ्यावी.

शॉप नं.२, आर्शिवाद कॉम्प्लेक्स सी.एच.एस.,
प्लॉट नं. १, सेक्टर–८३, कोपरखैराणे,
नवी मुंबई–४००७०९.

सही/–
ॲड. प्रविण सदाशिव हंकारे

जाहीर सूचना

(नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम १०२ अन्वये, इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट कर्जदारांच्या वैयक्तिक जामीनदारांसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१९ च्या सहवाचिता नियम ७)

वरुण रिसोर्सेस लि. च्या वैयक्तिक जामीनदार, श्री. युधिष्ठिर दिलीप खटाऊ यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील

१.	वैयक्तिक जामीनदाराचे नाव	श्री. युधिष्ठिर दिलीप खटाऊ वरुण रिसोर्सेस लि. च्या वैयक्तिक जामीनदार
२.	वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता (शेवटचा ज्ञात)	खटाऊ बंगला, ६ मानव मंदिर रोड, मलबार हिल्स, मुंबई - ४००००६
३.	वैयक्तिक जामीनदारासंदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याची तारीख	२७ ऑक्टोबर २०२६
४.	निर्णय घेणाऱ्या प्राधिकरणाचे तपशील	राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, न्यायालय-१
५.	रिझोल्यूशन प्रोफेशनल म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोर व्यावसायिकांचे नाव आणि नोंदणी क्र.	श्री.हरी किशन भोकले नोंदणी क्र.: IBBI/IPA-003/IP NO0228/2019-2020/12696
६.	बोर्डाकडे नोंदणीकृत रिझोल्यूशन प्रोफेशनलचा पत्ता आणि ई-मेल	९०५ ई रहेजा रेसिडेन्सी ऑफ जनरल ए के वैद्य मार्ग, मालाड, पूर्व मुंबई, महाराष्ट्र-४०००९७ **ईमेल : bhoklay.hk@hotmail.com**
७.	रिझोल्यूशन प्रोफेशनलशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल	केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड १६०१, चांडक युनिकॉर्न, दनाजी साळवे मार्ग, वीरा देसाई रोड जवळ, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३. प्रक्रियेसाठी विशिष्ट ईमेल आयडी:- ncltcasesvarunresourcespg@gmail.com
८.	दावे सादर करण्याची शेवटची तारीख	२४ नोव्हेंबर २०२६
९.	संबंधित फॉर्म	इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया च्या नियम ७ अंतर्गत विहित केलेले फॉर्म बी (कॉर्पोरेट जामीनदार ते कॉर्पोरेट ऋणको यांना दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) नियमावली, २०१९ फॉर्म डाउनलोड करण्यासाठी वेब लिंक:- https://ibbi.gov.in/en/home/downloads

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ न्यायालय-१ ने सी.पी.(आयबी)/५२५/(एमबी)२०२१ मध्ये दिनांक २७ ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या आदेशान्वये याचिका दाखल करून घेतली आणि वरुण रिसोर्सेस लि. च्या वैयक्तिक जामीनदार श्री. युधिष्ठिर दिलीप खटाऊ यांच्या दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेला सुरुवात करण्याचे आदेश दिले.

श्री. युधिष्ठिर दिलीप खटाऊ यांच्या धनकोंना, इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया च्या विहित केलेले फॉर्म बी (कॉर्पोरेट जामीनदार ते कॉर्पोरेट ऋणको यांना दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) नियमावली, २०१९ नियम ७ अंतर्गत विहित केलेल्या रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे २४ नोव्हेंबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी पुराव्यासह त्यांचे दावे फॉर्म बी मध्ये, नोंद क्र.७ विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

दावे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने, किंवा प्रत्यक्ष सुपुर्दगी, कुरिअर, स्पीड पोस्ट किंवा नोंदणीकृत पोस्टद्वारे सादर केले जाऊ शकतात.

दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

दिनांक: ३ नोव्हेंबर २०२६
ठिकाण: मुंबई

श्री. हरी किशन भोकले
रिझोल्यूशन प्रोफेशनल
श्री. युधिष्ठिर दिलीप खटाऊ यांच्या
वैयक्तिक दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेच्या बाबतीत
आयबीबीआय नोंदणी क्र. IBBI/IPA-003/IPN00228/2019-2020/12696
प्रक्रियेसाठी विशिष्ट ईमेल- ncltcasesvarunresourcespg@gmail.com

जाहीर सूचना

वासुदेव को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.
नोंदणीकृत कार्यालय: सूर्या, ७९ हिल रोड, वांद्रे पश्चिम, मुंबई ४०००५०, महाराष्ट्र.
(नोंदणी क्र.: BOM/W-HW/HSG/TC/2058/85-86 दिनांक १८.३.१९८६)

संस्थेच्या संपूर्ण मालमत्तेच्या प्रस्तावित थेट विक्रीकरिता प्रस्तावांचे आमंत्रण

याद्वारे सूचना देण्यात येते की, वासुदेव को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. द्वारे त्यांच्या दि. १४ सप्टेंबर, २०२६ आणि १ नोव्हेंबर, २०२६ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये, संस्थेच्या मालमत्तेची, लागू कायदा आणि संस्थेच्या सर्वसाधारण सभेद्वारे मंजूर केलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून सार्वजनिक निविदा काढून थेट विक्री करण्याच्या शक्यता पडताळून पाहण्याचा एकमताने ठराव करण्यात आला.

त्यानुसार, संस्था याद्वारे जमीन आणि त्यावर उभी इमारत(ती) समाविष्ट असलेली संपूर्ण मालमत्ता, व त्यासह कायदेशीररित्या हस्तांतरित करता येण्याजोगे असे हस्तांतरणीय हक्क, हितसंबंध आणि उपसाधने यांच्या प्रस्तावित थेट संपादनाकरिता इच्छुक खरेदीदार, विकासक, कंपन्या, संस्था आणि इतर पात्र घटकांकडून प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.

मालमत्तेचे तपशील

संस्थेचे नाव: वासुदेव को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.
पत्ता: सूर्या, ७९ हिल रोड, होली फॅमिली रुग्णालयासमोर, वांद्रे पश्चिम, मुंबई ४०००५०, महाराष्ट्र.
सीटीएस क्र.: १८ आणि १९ वांद्रे बी गाव, मोजमाप २०२४.४० चौ.मी.
इमारत: तळमजला आणि ७ (सात) वरील मजले आणि चाळ संरचना.
सदनिका/युनिट्सची संख्या: चाळीमध्ये २६ निवासी सदनिका, १ दवाखाना आणि ९ निवासी/भाडेकरू.
शीर्षक/अभिहस्तांतरण: संस्था सध्या विद्यमान जमीन मालकांकडून जमीन/मालमत्तेचे अभिहस्तांतरण संस्थेच्या नावे प्राप्त करण्याची प्रक्रिया करीत आहे. त्यानुसार, या निविदेशी संबंधित कोणताही प्रस्तावित व्यवहार अभिहस्तांतरण आणि हा विद्यमान जमीन मालक आणि/किंवा इतर संबंधित पक्षकारांकडून कायदेशीररित्या आवश्यक असणाऱ्या दस्तऐवज, करारनामे, परवानग्या आणि मंजुऱ्या मिळण्याच्या अधीन असेल. संस्था कोणतेही विधान करीत नाही की, अभिहस्तांकन याआधीच त्यांच्या नावे पूर्ण झालेले आहे.

प्रस्तावाचे आमंत्रण

इच्छुक पक्षकारांना संपूर्ण मालमत्तेच्या थेट तत्त्वावर खरेदीकरिता, निविदा दस्तऐवजांनुसार मोहोरबंद पाकिटातून त्यांचे प्रत्यक्ष प्रस्ताव सादर करण्याकरिता आमंत्रित करण्यात येत आहे.

प्रस्तावामध्ये खालील बाबींचा स्पष्टपणे उल्लेख असावा:

१. प्रस्तावित पेमेन्ट वेळापत्रक;
२. व्यवहार पूर्ण करण्याकरिता आवश्यक असलेला कालावधी;
३. बोलीदाराचे तपशील आणि परिचयपत्रे;
४. निधीची वित्तीय क्षमता/पुरावा;
५. प्रस्तावाशी संबंधित कोणत्याही शर्ती; आणि
६. बोलीदाराच्या अधिकृत प्रतिनिधींचे तपशील.

निविदेच्या अटी

१. प्रस्ताव संपूर्ण मालमत्तेकरिता एक संयुक्त व्यवहार म्हणून सादर करावे. भागशः प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाहीत.
२. बोलीदार मालमत्तेच्या बाबतीतील त्यांच्या स्वतःच्या कायदेशीर, आर्थिक, तांत्रिक आणि प्रत्यक्ष चौकशीकरिता जबाबदार असतील.
३. संस्था वाजवी अटींच्या अधीन राहून, उपलब्ध असणारे शीर्षक आणि मालमत्ता दस्तऐवज, तपासणीकरिता इच्छुक बोलीदारांना उपलब्ध करून देईल.
४. प्रस्तावाचे सादरीकरण बोलीदाराच्या नावे कोणताही हक्क, शीर्षक किंवा कोणत्याही स्वरुपाचा हितसंबंध तयार करीत नाही.
५. उच्चतम प्रस्ताव आपोआपच स्वीकारण्यात आला असे मानण्यात येणार नाही. संस्था, सर्वसाधारण सभेच्या अधिकार आणि लागू कायद्याच्या अधीन राहून एक किंवा जास्त बोलीदारांसह बोलणी करण्याचे आणि/किंवा कोणताही किंवा सर्व प्रस्ताव फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवीत आहे.
६. कोणतीही अंतिम विक्री/हस्तांतरण हे निश्चित कायदेशीर दस्तऐवजांच्या अंमलबजावणीच्या आणि सर्व लागू कायदेशीर व वैधानिक आवश्यकतांच्या पूर्ततेच्या अधीन असेल.
७. व्यवहार अभिहस्तांतरण प्रक्रिया पूर्ण होण्याच्या आणि जमीन मालक आणि इतर संबंधित पक्षकारांकडून कायदेशीररित्या आवश्यक सर्व दस्तऐवज आणि मंजुऱ्या विद्यमान मिळविण्याच्या/अंमलबजावणीच्या अधीन असेल.
८. संस्था सर्वसाधारण सभेच्या ठराव आणि लागू कायद्यानुसार निविदा प्रक्रिया सुधारणे, पुढे ढकलणे, मागे घेणे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवीत आहे.
९. सर्व वैधानिक देणी, कर, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क आणि व्यवहाराशी संबंधित खर्च, हे पक्षकारांमधील अंतिम करारानुसार हाताळण्यात येतील.
१०. तथापि, मालमत्तेचा रिक्त ताबा तेव्हाच देण्यात येईल, जेव्हा पूर्ण आणि अंतिम रक्कम प्राप्त होईल आणि संबंधित सदनिका मालक, दवाखाना मालक, जमीन मालक व चाळीतील रहिवासी यांच्यासोबत विक्री करारनामा पूर्ण केला जाईल.

प्रस्तावाचे सादरीकरण

निविदा दस्तऐवज उपलब्ध होण्याचे ठिकाण: वासुदेव को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.चे संस्था कार्यालय, सूर्या, होली फॅमिली रुग्णालयासमोर, ७९ हिल रोड, वांद्रे पश्चिम, मुंबई ४०००५०, येथे दि. ३ नोव्हेंबर, २०२६ ते २० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत रविवार वगळता स. ११ ते दु. २ दरम्यान.
बोली पूर्व सभा: शनिवार, दि. २१ नोव्हेंबर, २०२६ रोजी स. ११.०० वा. संभाव्य बोलीदारांच्या शंका आणि प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता. ठिकाण संस्थेद्वारे कळविण्यात येईल. बोलीदार wassoodewchsl@gmail.com येथे ईमेलद्वारे त्यांचे प्रश्न आगाऊरित्या विचारू शकतात. संस्थेवर बंधनकारक उत्तरे लेखी स्वरुपात पारित करण्यात येतील.
सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक आणि वेळ: दि. ३० नोव्हेंबर, २०२६ रोजी दु. २.०० वाजेपर्यंत.
प्रस्ताव उघडण्याचा दिनांक आणि वेळ (अंदाजित): दि. ६ डिसेंबर, २०२६ रोजी स. ११.०० वा. ठिकाण नंतर कळविण्यात येईल. निविदा दस्तऐवज शुल्क: रु. ५०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) वासुदेव को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या नावे काढलेल्या पे ऑर्डरद्वारे.
सादरीकरणाचे ठिकाण आणि पद्धत: प्रत्यक्षरित्या संस्थेचे कार्यालय, वासुदेव को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., सूर्या, होली फॅमिली रुग्णालयासमोर, ७९ हिल रोड, वांद्रे पश्चिम, मुंबई ४०००५० येथे तांत्रिक आणि आर्थिक बोली स्वतंत्र पाकिटात भरून मोहोरबंद पाकिटातून.
संपर्क: अबुझार सय्यद रिझवी: ९७६८८८६४०१
अनिमेश चैनी: ९८२०००९२४२, **ईमेल:** wassoodewchsl@gmail.com
संस्था निविदा प्रक्रियेशी संबंधित सर्व हक्क राखून ठेवीत आहे.

सही/-
दिनांक: ३ नोव्हेंबर, २०२६
ठिकाण: मुंबई
व्यवस्थापकीय समितीच्या आदेशाद्वारे
वासुदेव को-ऑप. हौ. सोसा. लि.

सुविचार


विलास कोळेकर
मालेवाडी, जि. सांगली. मोबा.९४२२४२०६११

अति आनंदात कोणाला वचन देऊ नका,
क्रोधात कोणाला उत्तर देऊ नका.
आणि दुःखात कधीही, कोणताही मोठा निर्णय घेऊ नका.

पंचांग

मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* आश्विन कृष्ण नवमी*
नक्षत्र - मघा
-: जन्मराशी :-
००-०१ ते ०३-४५ कर्क
०३-४६ ते २४-०० सिंह

रवी उदय- ०६-४१
रवी अस्त- १८-०३



चंद्रपाणी महाराज जयंती (महानुभाव)

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

ई-लिलाव विक्री सूचना

(नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ अंतर्गत)
व्हर्गो होम डिझाइनर प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)
सीआयएन : U52609MH2010PTC241562
नोंद.कार्यालय : गोडाऊन क्र.१, इमारत क्र.१८३, जम्बोशेड गोडाऊन, गाव गुंदावली, तालुका - भिवंडी, ठाणे, मुंबई - ४२१३०२ संपर्क क्र.: ०२२ २०८२१२२०

माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ च्या आदेशानुसार, **व्हर्गो होम डिझाइनर प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)** च्या मालमत्तेच्या विक्रीसाठी, खालील तक्त्यात नमूद केलेल्या तपशिलानुसार ई-लिलावाद्वारे सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे. कॉर्पोरेट कर्जदाराची मालमत्ता कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाईशिवाय **'जसे आहे जेथे आहे या आधारावर', 'जसे आहे जे आहे या आधारावर', 'जसे आहे जे काही आहे या आधारावर' आणि '